


दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com




सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २१ वे, अंक ८४ वा | सोमवार, दि. २६ ऑक्टोबर २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

# खंडणीखोरांचा म्होरक्या राणा सूर्यवंशी रुबी हॉलमधून फरार?
# चौकशीपूर्वीच गायब झाल्याच्या वृत्ताने खळबळ!

## कथित हल्ला प्रकरणाला धक्कादायक वळण
### जवळच्या तीन मित्रांचाही शोध सुरू,सीसीटीव्ही फुटेजमधून नवे धागेदोरे
### राणा सुर्यवंशी व त्याच्या खंडणीखोर टोळीचा पर्दाफाश पोलीस लवकरच करणार



**पुणे/बारामती (कटूसत्य वृत्त)** : बारामती विमानतळ परिसरात राणा सूर्यवंशी याच्यावरील कथित हल्ला प्रकरणाने आता अनपेक्षित वळण घेतले आहे. खंडणीखोर टोळीचा म्होरक्या असलेला राणा सूर्यवंशी आता पोलिसांच्या तपासाच्या केंद्रस्थानी आल्याचे वृत्त समोर आले आहे. रुबी हॉल रुग्णालयातून चौकशीपूर्वीच तो फरार झाल्याचे वृत्त माध्यमातून चर्चेत येत असताना, त्याच्या जवळच्या तीन व्यक्तींचाही पोलिसांकडून शोध सुरू असल्याचे वृत्त प्रसिद्ध झाले आहे. त्यामुळे या संपूर्ण प्रकरणातील नेमके सत्य बाहेर काढल्याशिवाय पोलीस गप्प बसणार नाहीत असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

**हल्ला प्रकरणात संशयाची दिशा बदलली!**

१८ ऑक्टोबर रोजी बारामती परिसरात राणा सूर्यवंशी याच्यावर हल्ला झाल्याची घटना घडली. सुरुवातीच्या माहितीनुसार, दुचाकीवरून आलेल्या दोन व्यक्तींनी त्याच्याजवळ येत हल्ला केला. गोळीबाराचा प्रयत्न झाल्याचे सांगण्यात आले; मात्र राणाला गोळी लागल्याचे निष्पन्न झाले नव्हते. धारदार शस्त्राच्या वारामुळे त्याच्या हाताला दुखापत झाली होती. त्यानंतर त्याला पुण्यातील रुबी हॉल क्लिनिक येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले. या घटनेनंतर पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवली. सीसीटीव्ही फुटेज, संशयितांच्या हालचाली, आर्थिक व्यवहार आणि संबंधित व्यक्तींमधील संपर्क यांची तपासणी सुरू झाली. आता याच तपासातून हल्ल्यामागील कथित कटाबाबत नवे प्रश्न उपस्थित झाले आहेत.

**सुपारी राणा ने दिली..!**

खात्री लायक सुत्रांच्या वृत्तांनुसार, हल्ला घडवून आणण्यासाठी दोन लाख रुपयांची कथित सुपारी राणा सुर्यवंशी यानेच दिल्याचे पोलीस तपासात जवळपास निष्पन्न झाले आहे. या प्रकरणात राणा सूर्यवंशी याचा वाहनचालक व भिगवन परीसरातील राणाचा वसूलदार ज्ञानदेव शिंदे आणि पार्थ आव्हाळे यांच्यासह अन्य संशयितांची नावे समोर आली आहेत. काही संशयितांना अटक करण्यात आली असून, इतरांचा शोध सुरू असल्याचे वृत्त आहे.

पोलिसांच्या तपासानुसार, कथित सुपारीचे आर्थिक व्यवहार कोणी केले, हल्लेखोरांशी संपर्क कोणी साधला आणि या कटामागे आणखी कोणाचा सहभाग आहे, याचा शोध घेतला जात आहे.




**वाय प्लस सुरक्षेवरही प्रश्नचिन्ह**

राणा सूर्यवंशी याला वाय श्रेणीची सुरक्षा देण्यात आले होते. हल्ल्याच्या वेळी सुरक्षा कर्मचारी नेमके कुठे होते, सुरक्षेच्या नियमांचे पालन झाले होते का आणि या व्यवस्थेचा प्रशासकीय आधार काय होता, यावरही प्रश्न उपस्थित झाले आहेत.

माध्यमातून प्रसिद्ध झालेल्या वृत्तानुसार, पोलीस महासंचालकांनी राणा सूर्यवंशी याच्या सुरक्षा व्यवस्थेबाबत आढावा घेतला असून, संबंधित अधिकाऱ्यांच्या भूमिकेची चौकशी करण्याचे निर्देश दिल्याचे सांगण्यात आले आहे. त्यामुळे या प्रकरणात केवळ हल्ल्याचा तपास नव्हे, तर सुरक्षा व्यवस्थेची जबाबदारीही महत्त्वाची ठरत आहे.

**दोन लाखांच्या कथित**
**जवळच्या तीन मित्रांच्या हालचाली संशयाच्या भोवऱ्यात.**

या प्रकरणातील सर्वांत महत्त्वाची बाब म्हणजे राणा सूर्यवंशी यांच्या निकटवर्तीय असलेल्या तीन व्यक्तींच्या हालचाली पोलिस तपासाच्या कक्षेत आहेत. या व्यक्ती कथित हल्ल्यापूर्वी आणि त्यानंतर कुठे होत्या, कोणाला भेटल्या आणि त्यांचा संशयितांशी काही संबंध होता का, याची चौकशी केली जात असल्याचे सांगण्यात येत आहे. विश्वासनिय सुत्रांच्या वृत्तांनुसार, डिफेंडर वाहनातून संशयित व्यक्तींना भेटल्याचे सीसीटीव्ही फुटेज पोलिसांच्या हाती लागले आहे. तसेच, पोलिसांचा संशय वाढल्यानंतर संबंधित व्यक्तींचे फोन बंद असल्याचे आणि त्यांचा शोध सुरू आहे. या सर्व खंडणीखोर व्यक्तींची चौकशी झाल्यानंतरच कथित कटातील त्यांची नेमकी भूमिका स्पष्ट होऊ शकते. त्यांचा एकमेकांशी झालेला संपर्क, कॉल रेकॉर्ड CDR, ओळख किंवा सीसीटीव्हीतील उपस्थितीच्या आधारे दोष निश्चित करून स्वतंत्र आणि ठोस पुरावे मिळाल्याचे खात्रीलायक वृत्त आहे.

**रुबी हॉलमधून फरार झाल्याचे वृत्त;**

राणा सूर्यवंशी रुबी हॉल रुग्णालयातून चौकशीपूर्वीच फरार झाल्याचे वृत्त आल्याने या प्रकरणात अनेक रुबी हॉल रुग्णालयाच्या प्रशासकीय आणि तपासविषयक प्रश्न निर्माण झाले आहेत. तो रुग्णालयातून नेमका कधी बाहेर पडला ? त्याला रुग्णालयातून जाण्याची वैद्यकीय परवानगी होती का ? पोलिसांना त्याच्या हालचालींची माहिती दिली होती का ? त्याला चौकशीसाठी अधिकृत नोटीस देण्यात आली होती का? या प्रश्नांची उत्तरे महत्त्वाची ठरतील.

**आता सत्य बाहेर येणारच...!**

राणा सूर्यवंशी याच्यावरील कथित हल्ला, दोन लाखांच्या सुपारीचा संशय, निकटवर्तीयांच्या हालचाली आणि रुग्णालयातून फरार झाल्याने या सर्व बाबींची स्वतंत्रपणे पडताळणी होणे आवश्यक आहे. सीसीटीव्ही फुटेज, कॉल डिटेल रेकॉर्ड, आर्थिक व्यवहार, रुग्णालयातील नोंदी आणि संबंधित व्यक्तींचे जबाब यांतूनच घटनाक्रम स्पष्ट होऊ शकतो. पोलीसांच्या हाती पुराव्यांतूनच सत्य समोर आल्याने. राणा सूर्यवंशी रुग्णालयातून खरोखर फरार झाला आहे का, त्याच्या जवळच्या तीन व्यक्तींचा कथित कटात सहभाग आहे का आणि हल्ल्यामागील सूत्रधार कोण, या प्रश्नांची उत्तरे पोलिसांच्या अधिकृत तपासातूनच मिळतील. हाय-प्रोफाइल प्रकरण असल्यामुळे तपास पारदर्शक, निष्पक्ष आणि पुराव्यांवर आधारित होणे हीच जनतेची अपेक्षा आहे.

**खंडणीखोर टोळीचा लवकरच पर्दाफाश.. ?**

राणा सूर्यवंशी आणि त्याच्याशी संबंधित खंडणीखोर टोळीबाबत पोलीस तपासातून लवकरच महत्त्वाचे धागेदोरे व खुलासे होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. या प्रकरणातील आर्थिक व्यवहार, संबंधित व्यक्तींची भूमिका आणि इतर पुराव्यांची तपासणी सुरू असल्याची चर्चा आहे. ज्या ज्या व्यक्तींना व संस्थांना या खंडणीखोर टोळीने त्रास दिला आहे त्या सर्वांनी पोलिसांकडे येऊन तक्रारी देणं गरजेचं असल्याचं काही वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी सांगितले.

## दत्तकला शिक्षण संस्था व झोळ कुटुंबीयांना वाचविण्यासाठी पृथ्वीराज झोळ यांची भावनिक साद

### 'सत्य समोर आणा, निष्पक्ष चौकशी करा';
### पोलिसांसह समाजबांधवांना न्यायासाठी पुढे येण्याचे आवाहन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):** दत्तकला शिक्षण संस्थेच्या व्यवस्थापनाभोवती निर्माण झालेला वाद आणि राणा सूर्यवंशी याच्याशी संबंधित प्रकरणामुळे सध्या राजकीय व सामाजिक वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे. या पार्श्वभूमीवर भाजप नेते रामदास झोळ यांचे चिरंजीव पृथ्वीराज झोळ यांनी दत्तकला शिक्षण संस्था आणि झोळ कुटुंबीयांच्या पाठीशी उभे राहण्याचे आवाहन पोलिसांसह समाजबांधवांना केले आहे. दैनिक कटूसत्य शी बोलताना पृथ्वीराज म्हणाला की, मागील काही वर्षांपासून राणा सुर्यवंशी हा दत्तकला शिक्षण संस्था आणि झोळ कुटुंबीयांनी त्रास देत आहे. काही अधिकाऱ्यांना




दत्तकला शिक्षण संस्थेचा व झोळ कुटुंबियांचा कोणत्याही गुन्ह्यात कसलाही आणि काडीमात्र ही संबंध नसल्याचे पुरावे पुणे येथे झालेल्या पत्रकार परिषदेत करमाळ्याचे नेते नवनाथ (बापू) झोळ, युवा नेते हर्षवर्धन झोळ, दत्तकला शिक्षण समूहाचे पृथ्वीराज झोळ व युवा विधिज्ञ ॲड. वैभव भोसले या सर्वांनी सादर करताना.

हाताशी धरून राणा सुर्यवंशी यांनी माझे आई वडील यांच्या विरोधात खोटे गुन्हे दाखल करून गुंतविले आहे. त्यांना सोडवण्यासाठी प्रयत्न करणारे माझे चुलते नवनाथ झोळ व चुलत भाऊ हर्षवर्धन झोळ यांना ही खोट्या गुन्ह्यात अडकवण्याची प्रयत्न करत होता. परंतु काही चांगल्या व प्रामाणिक वरीष्ठ अधिकार्यांमुळे ते होऊ शकले नाही. तसेच संस्थेची प्रतिष्ठा, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित आणि कुटुंबीयांवरील आरोपांची सत्यता याबाबत निष्पक्ष तपास व्हावा. कोणाच्याही दबावाला बळी न पडता उपलब्ध पुरावे, कागदपत्रे आणि संबंधितांचे जबाब तपासून सत्य समोर आणावे, अशीही अपेक्षा व्यक्त केली आहे.

## राणा सूर्यवंशींची Y+ सुरक्षा काढण्याची मागणी कोणाच्या शिफारशीवर सुरक्षा दिली ?

### कथित हल्ला प्रकरणानंतर सुरक्षा मंजुरीवर प्रश्नचिन्ह; सरकारी पोलीस ताफा, परजिल्ह्यातील कर्मचाऱ्यांची नियुक्ती आणि मंजुरीच्या निकषांची चौकशी करण्याची मागणी

**बारामती/पुणे (कटूसत्य वृत्त)** : उद्योजक राणा सूर्यवंशी यांना पुरविण्यात आलेल्या Y+ दर्जाच्या पोलीस सुरक्षेचा मुद्दा आता ऐरणीवर आला आहे. बारामतीतील १८ ऑक्टोबर रोजीच्या कथित हल्ला प्रकरणानंतर त्यांच्या सुरक्षेची आवश्यकता, मंजुरीचा प्रशासकीय आधार आणि या व्यवस्थेसाठी तैनात करण्यात आलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीबाबत गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत. संबंधित सुरक्षा व्यवस्थेची फेरतपासणी करून, नियमांच्या कसोटीवर तिची आवश्यकता सिद्ध होत नसेल तर सुरक्षा काढून घेण्याची मागणी जोर धरत असल्याने या सुरक्षेच्या व्यवस्थेबाबत पोलीस महासंचालक स्तरावर चौकशीचे आदेश दिल्याची माहितीही काही माध्यमातून प्रसिद्ध झाली आहे.

**परजिल्ह्यातील पोलीस कर्मचारी तैनात करण्याची गरज काय ?**

राणा सूर्यवंशी यांच्या सुरक्षेसाठी विविध ठिकाणांतील पोलीस कर्मचारी तैनात असल्याचा मुद्दाही चर्चेत आला आहे. संबंधित कर्मचाऱ्यांची नियुक्ती कोणत्या आदेशानुसार करण्यात आली, त्यासाठी संबंधित जिल्ह्यांची परवानगी होती का, तसेच या व्यवस्थेचा प्रशासकीय आणि मनुष्यबळावरील परिणाम काय झाला, याची चौकशी होणे गरजेचे आहे. सुरक्षेच्या नावाखाली सरकारी मनुष्यबळाचा वापर होत असल्यास त्याबाबत स्पष्ट नियम आणि उत्तरदायित्व असले पाहिजे. मात्र, नियुक्त्या नियमबाह्य झाल्या



असल्यास त्याची चौकशी झाली पाहिजे अशी मागणी केली जात आहे.

**कथित हल्ल्यामुळे सुरक्षेच्या व्यवस्थेवर प्रश्न**

१८ ऑक्टोबर रोजी बारामती परिसरात सूर्यवंशी यांच्यावर हल्ला झाल्याचे वृत्त समोर आले. या घटनेच्या वेळी त्यांचे सुरक्षा कर्मचारी नेमके कुठे होते, सुरक्षा वाहनांचा ताफा त्यांच्यासोबत होता का, आणि सुरक्षा व्यवस्थेतील नियमांचे पालन झाले होते का, याचीही पडताळणी महत्त्वाची आहे. दरम्यान, या हल्ल्याच्या तपासात सूर्यवंशी यांनीच हल्ल्याचा कट रचल्याचा दावा पोलिसांकडून करण्यात आल्याचे प्रसारमाध्यमांनी वृत्त दिले आहे. तपासातील निष्कर्ष आणि सुरक्षा मंजुरीसाठी पूर्वी नोंदवण्यात आलेली कारणे यांचा परस्पर संबंध आहे का, हे स्वतंत्रपणे तपासले पाहिजे.

सुरक्षा काढण्याच्या मागणीमागील समाज माध्यमातील प्रमुख प्रश्न असे आहेत की, राणा सूर्यवंशी यांना + सुरक्षा देण्याचा निर्णय नेमका कोणी आणि कोणत्या आधारावर घेतला? त्याच्या जीविताला असलेल्या

**सुरक्षा कोणत्या आधारावर मंजूर झाली ?**

एखाद्या व्यक्तीला Y+ दर्जाची सुरक्षा देताना तिच्या जीविताला असलेला संभाव्य धोका, उपलब्ध गुप्तचर माहिती, संबंधित यंत्रणांचे मूल्यमापन आणि सक्षम प्राधिकरणाचा निर्णय महत्त्वाचा असतो. त्यामुळे राणा सूर्यवंशी यांना ही सुरक्षा देताना नेमका कोणता धोका नोंदवण्यात आला होता, सुरक्षा मंजुरी कोणी दिली आणि त्यासाठी कोणते निकष वापरण्यात आले, याची माहिती समोर येणे आवश्यक आहे. यापूर्वी सप्टेंबर २०२५ मध्ये सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोट रस्त्यावर सूर्यवंशी यांच्यावर हल्ला झाल्याचे वृत्त प्रसिद्ध झाले होते. त्यानंतर त्यांना सुरक्षा पुरविण्यात आल्याचेही वृत्तांत नमूद आहे. त्यामुळे त्या घटनेचा सुरक्षा मंजुरीशी नेमका काय संबंध होता आणि त्यानंतरच्या धोक्याच्या मूल्यमापनात कोणते बदल झाले, याची पडताळणी आवश्यक ठरते.

संभाव्य धोक्याबाबत कोणते अधिकृत मूल्यमापन करण्यात आले होते? सुरक्षेसाठी तैनात केलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्या आणि एस्कॉर्ट व्यवस्थेला नियमानुसार मंजुरी होती का? बारामतीतील कथित हल्ल्याच्या वेळी सुरक्षा व्यवस्थेत काही त्रुटी होत्या का?

५. नव्या तपासाच्या पार्श्वभूमीवर सुरक्षा सुरू ठेवण्याची आवश्यकता पुन्हा तपासण्यात आली आहे का?

६. सुरक्षा मंजुरी किंवा अंमलबजावणीत अनियमितता आढळल्यास संबंधित निर्णय आणि अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित केली जाणार का?

**सुरक्षा ही प्रतिष्ठा नव्हे, तर गरज!**

Y+ सुरक्षा ही कोणत्याही व्यक्तीच्या प्रतिष्ठेचे प्रतीक नसून संभाव्य धोक्याच्या मूल्यमापनावर आधारित व्यवस्था आहे. त्यामुळे सुरक्षा देण्याचा निर्णय ज्या कारणांवर घेण्यात आला, त्याची वेळोवेळी पडताळणी होणे आवश्यक आहे. संबंधित व्यक्तीला सुरक्षा सुरू ठेवण्याची वस्तुनिष्ठ गरज नसेल किंवा मंजुरीच्या प्रक्रियेत अनियमितता आढळली, तर नियमानुसार पुनरावलोकन करून योग्य निर्णय घेणे प्रशासनाचे कर्तव्य आहे. आता प्रश्न एवढाच आहे की, राणा सूर्यवंशी यांना दिलेल्या + सुरक्षेचा संपूर्ण प्रशासकीय तपशील जनतेसमोर येणार का? सुरक्षा मंजुरी, पोलीस ताफ्याची नियुक्ती आणि कथित हल्ल्याच्या तपासातील निष्कर्ष यांची निष्पक्ष चौकशी होऊन सत्य स्पष्ट होणार का?

या प्रकरणात कोणालाही दोषी ठरवण्याऐवजी अधिकृत कागदपत्रे, सुरक्षा मूल्यमापन आणि तपासातील पुराव्यांच्या आधारे निर्णय घेणे आवश्यक आहे. सुरक्षा सुरू ठेवायची की काढून घ्यायची, याचा निर्णय सक्षम प्राधिकरणाने नियमांनुसार आणि उपलब्ध पुराव्यांच्या आधारे घ्यावा, हीच जनतेची अपेक्षा.

## क्लिपमागचं सत्य शोधून दाखवा
## मनोज जरांगेंचं फडणवीस-शिंदेंना ओपन चॅलेंज

**अंतरवली सराटी (कटूसत्य वृत्त):-** मनोज जरांगे पाटील यांनी समोर आणलेल्या कथित ऑडिओ क्लिपवरून राज्यातील राजकीय वातावरण तापलं आहे. या क्लिपवरून शिवसेना आणि भाजपच्या नेत्यांमध्ये आरोप प्रत्यारोपांच्या फैरी झडल्या.



रामदास कदम यांनी भाजप नेत्यांवर टीका केली, तर भाजपकडून देखील त्याला जोरदार प्रत्युत्तर देण्यात आलं. त्यांनतर दोन्ही पक्षांतील वरिष्ठ नेत्यांनी संयमाची भूमिका घेण्याचा सल्ला दिल्याने आरोप-प्रत्यारोप काहीसे शांत झाल्याचे चित्र आहे. मात्र, आता याच मुद्द्यावरून मनोज जरांगे पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना थेट आव्हान दिलं आहे. कथित ऑडिओ क्लिपमागचं सत्य शोधून जनतेसमोर आणा, असं आव्हान जरांगे यांनी दिलं आहे.

माध्यमांशी संवाद साधताना जरांगे पाटील यांनी दोन्ही पक्षांतील नेत्यांच्या भूमिकेवर प्रश्न उपस्थित केले. ते म्हणाले की, आमचं आंदोलन चिरडण्याचा प्रयत्न झाला आणि आता या कथित ऑडिओ क्लिपवरून दोन्ही पक्षांचे नेते एकमेकांवर आरोप करत आहेत. मात्र, हे आरोप-प्रत्यारोप थांबले तर या प्रकरणातील सत्य समोर

(पान 2 वर..)




## मराठा विद्यार्थ्यांच्या शुल्कवसुलीला लगाम!; ओबीसींपेक्षा जास्त फी घेता येणार नाही

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** मराठा समाजातील विद्यार्थ्यांना इतर मागासवर्गीय (ओबीसी) प्रवर्गातील विद्यार्थ्यांप्रमाणे शैक्षणिक सवलती आणि सोयी-सुविधांचा लाभ मिळावा, यासाठी राज्य सरकारने कठोर भूमिका घेतली आहे. मराठा विद्यार्थ्यांकडून ओबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांना लागू असलेल्या शिक्षण शुल्कापेक्षा अधिक शुल्क आकारू नये, तसेच शुल्क भरले नसले तरी प्रवेशप्रक्रियेत कोणताही अडथळा निर्माण करू नये, असे स्पष्ट निर्देश संबंधित विभागांना दिले आहेत. या निर्णयाची अंमलबजावणी न करणाऱ्या शैक्षणिक संस्था



आणि महाविद्यालयांवर कारवाई करण्याचेही निर्देश दिले आहेत.

अंमलबजावणीवर लक्ष शासन निर्णयाची केवळ कागदोपत्री अंमलबजावणी न होता त्याचा प्रत्यक्ष लाभ विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचावा, या दृष्टीने संबंधित विभागांनी कार्यवाही करणे अपेक्षित आहे. तसेच, शासन निर्णय आणि मंत्रिमंडळ उपसमितीच्या निर्देशांनुसार केलेल्या कार्यवाहीचा सद्यःस्थितीदर्शक अहवाल तातडीने सादर करण्यास सांगण्यात आले आहे.

संबंधित विभागांवर असणार सवलतींची जबाबदारी मराठा विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या शैक्षणिक सवलतींची अंमलबजावणी सुनिश्चित करण्याची जबाबदारी संबंधित विभागांवर सोपविण्यात आली आहे. त्यानुसार विभागांनी आपल्या अखत्यारीतील शैक्षणिक संस्था व महाविद्यालयांना सूचना द्याव्यात, असे नमूद केले आहे. निर्धारित शुल्कापेक्षा अधिक रक्कम विद्यार्थ्यांकडून घेतली जाणार नाही, याची दक्षता घेण्याची जबाबदारीही संबंधित विभागांवर असेल. त्यामुळे शैक्षणिक सवलतींच्या लाभासाठी पात्र असलेल्या विद्यार्थ्यांना प्रवेशाच्या वेळी अतिरिक्त आर्थिक भार सहन करावा लागू नये, हा या निदेर्शांचा राज्य सरकारचा उद्देश आहे.

## संपादकीय

# शिक्षक-पदवीधर निवडणूक की पाकिटांचा बाजार?

लोकशाहीचा उत्सव पैशांच्या व्यवहारात अडकला; निवडणूक यंत्रणा नेमकी कुठे होती? शिक्षक आणि पदवीधर हे समाजाला दिशा देणारे घटक. विचारांची पेरणी करणाऱ्या या वर्गाच्या मतदानालाच पैशांचे आमिष दाखवले जात असल्याचे आरोप समोर येत असतील, तर लोकशाहीच्या नैतिकतेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण होते. शिक्षक आणि पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीत मतदारांचा आवाज, त्यांची वैचारिक भूमिका आणि उमेदवारांची गुणवत्ता यांची चर्चा व्हायला हवी. मात्र, मतदानाच्या बदल्यात पाकिटे वाटली जात असल्याचे आरोप होत असतील, शिक्षक मतदारांसाठी १५ हजार रुपये, पदवीधर मतदारांसाठी ५ हजार रुपये, तर काही ठिकाणी शिक्षक मतदारांना प्रत्येकी २५ हजार रुपये देण्याची चर्चा होत असेल, तर ही निवडणूक नेमकी कोणत्या दिशेने चालली आहे, असा प्रश्न उपस्थित होणे स्वाभाविक आहे. हे आकडे आणि पाकिटवाटपाचे दावे संबंधित व्यक्तींच्या आरोपांवर आधारित असून, त्यांची स्वतंत्रपणे पडताळणी होणे आवश्यक आहे. मात्र, अशा चर्चा प्रत्यक्ष मतदानाच्या वातावरणात होत असतील, तर निवडणूक प्रक्रियेच्या पारदर्शकतेची कसोटी लागल्याशिवाय राहत नाही. पाकिटासाठी वशिला, सामान्य मतदारांची फरपट! समोर आलेल्या अनुभवकथनानुसार, काही मतदारांना घरी फोन करून पाकिटे पोहोचवली जात असल्याचा, तर काही ठिकाणी मतदान केंद्रांजवळ कार्यकर्त्यांमार्फत पाकिटे दिली जात असल्याचा आरोप आहे. एखाद्या नगरसेवकाचा फोन किंवा संदेश असेल, तर तातडीने सेवा; अन्यथा तासन्तास प्रतीक्षा! गर्दी वाढली की पाकिटे संपल्याचे सांगितले जाते, तर जबाबदारी सोपवलेल्या व्यक्तीकडेच पाकिटे शिल्लक राहत असल्याचीही तक्रार करण्यात आली आहे.जर हे आरोप खरे असतील, तर हा केवळ पैशांच्या वाटपाचा प्रश्न नाही; तो राजकीय कार्यपद्धतीतील पक्षपात, कार्यकर्त्यांची कथित निष्ठा आणि मतदारांच्या स्वाभिमानाचा प्रश्न आहे. मतदाराला मतदानासाठी आमिष दाखवणे आणि त्यानंतर त्यालाच एखाद्या नेत्याच्या वशिल्यासाठी रांगेत उभे राहावे लागणे, ही लोकशाहीची किती मोठी शोकांतिका आहे !शिक्षकांच्या मताची किंमत ठरवणारे कोण? शिक्षक हा केवळ कर्मचारी नसतो; तो पुढच्या पिढीचे विचार घडवणारा घटक असतो. त्याच्याकडून समाजाला विवेक, प्रामाणिकपणा आणि नैतिकतेची अपेक्षा असते. मग शिक्षक मतदारांच्या मतांनाही पैशांचे मूल्य लावले जात असल्याचे आरोप समोर येत असतील, तर या व्यवस्थेने आत्मपरीक्षण करायचे की नाही?मात्र, संपूर्ण शिक्षक किंवा पदवीधर वर्गाला दोष देणेही चुकीचे ठरेल. पैशांच्या आमिषाला बळी न पडता आपल्या विवेकाने मतदान करणारे मतदारही आहेत. प्रश्न अशा मतदारांचा नाही; प्रश्न आहे तो मत विकत घेण्याचा प्रयत्न करणाऱ्या प्रवृत्तींचा आणि त्यांना रोखण्याची जबाबदारी असलेल्या यंत्रणेचा.पोलिस आणि निवडणूक अधिकाऱ्यांना काहीच दिसले नाही? मतदानाच्या परिसरात खुलेआम पाकिटवाटप होत असल्याचा दावा केला जात असेल, तर पोलिस आणि निवडणूक अधिकाऱ्यांनी नेमकी कोणती कारवाई केली, हा महत्त्वाचा प्रश्न आहे. तक्रारी प्राप्त झाल्या होत्या का ? संबंधित ठिकाणचे सीसीटीव्ही फुटेज तपासले का ? पैशांच्या वाटपाबाबत कोणते पुरावे गोळा केले ? आचारसंहितेचे उल्लंघन आढळल्यास कारवाई झाली का? या प्रश्नांची उत्तरे आरोप-प्रत्यारोपांतून नव्हे, तर अधिकृत चौकशी आणि उपलब्ध पुराव्यांतून मिळायला हवीत. केवळ चर्चा सुरू आहे म्हणून कोणालाही दोषी ठरवता येणार नाही; पण गंभीर आरोपांकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. निवडणूक यंत्रणेची निष्पक्षता ही केवळ कागदावरील हमी नसून प्रत्यक्ष कृतीतून दिसली पाहिजे.

# शिक्षक - पदवीधर निवडणूकीची रंजक मतमोजणी

भारतीय लोकशाही ही जगातील सर्वात मोठी लोकशाही मानली जाते. ही लोकशाही केवळ संविधानावर आधारित नसून ती निवडणुकांच्या प्रक्रियेद्वारे जिवंत ठेवली जाते. लोकशाही म्हणजे केवळ मतदान करणे नव्हे, तर ती एक जीवनपद्धती आणि शासनप्रणाली आहे. अब्राहम लिंकन यांच्या शब्दात सांगायचे तर, "लोकांनी, लोकांच्या हितासाठी, चालवलेले लोकांचे राज्य म्हणजे लोकशाही." या लोकशाहीचा एक भाग म्हणून महाराष्ट्र विधान परिषदेच्या पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकाआता अंतिम टप्प्यात आल्या आहेत. औरंगाबाद विभाग, पुणे विभाग, नागपूर विभाग या ३ पदवीधर मतदारसंघामध्ये आणि अमरावती विभाग, पुणे विभाग या २ मतदारसंघामध्ये शुक्रवारी २३ ऑक्टोबर रोजी सकाळी ८ ते दुपारी ४ या कालावधीत मतदान प्रक्रिया पार पडली. ५ विभागाच्या मतदारसंघात मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला आहे. आता मंगळवारी २७ ऑक्टोबर २०२६ रोजी मतमोजणीची प्रक्रीया होणार आहे. ५ मतदारसंघातून १८२ उमेदवार निवडणूक लढवत आहेत. पाचही मतदारसंघाची निवडणूक यंत्रणा मतमोजणीसाठी सज्ज झाली आहे. या पार्श्वभूमीवर ही निवडणूक नेमकी कशी असते, मतमोजणीची प्रक्रिया कशी राबवली जाते हे समजून घेणे महत्वाचे आणि तेवढेच रंजक सुध्दा आहे.

मतपेट्या स्टॉंगरूममधून बाहेर आणून त्या-त्या टेबलवर सील उघडून रितसर मतपत्रिकांचे गठ्ठे बनवले जातात. मतमोजणी अधिकाऱ्यांकडून वैधतेसंबंधित शंकास्पद/संदिग्ध मतपत्रिका अंतिम निर्णयाकरीता सहायक निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकारी यांच्याकडे सादर केले जातात. याप्रमाणे वैध मतपत्रिकांचे पसंतीक्रमानूसार आवश्यक गठ्ठे बनवले जातात.

प्रत्यक्ष आकड्यांसह मतमोजणी कशी होते, हे आपण एका सोप्या काल्पनिक उदाहरणाद्वारे समजावून घेऊया.

समजा, एका शिक्षक/पदवीधर मतदारसंघात मतदानामध्ये एकूण १०,००० वैध मते (Valid Votes) पडली आहेत आणि निवडणुकीच्या रिंगणात ४ उमेदवार उभे आहेत (अ, ब, क आणि ड).

पायरी १: विजयासाठीचा कोटा (Quota) ठरवणे.

शिक्षक/पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीत जिंकण्यासाठी किती मते (कोटा) लागतात, हे काढण्यासाठी झालेल्या मतदानातील एकूण वैध मतांना २ ने भागणे आणि त्यात १ मिळवणे. हे सुत्र कोटा निश्चित करण्यासाठी वापरले जाते.

याचा अर्थ, वरील उदाहरणात ज्या उमेदवाराला विजयाची माळ गळ्यात पडायची असेल, त्याला किमान ५,००१ मते मिळवणे बंधनकारक ठरते. हा कोटा निश्चित केला जातो.

पायरी २: पहिली फेरी – पहिल्या पसंतीची (First Preference) मते मोजणे.

पहिल्या फेरीत फक्त आणि फक्त 'पसंती क्रमांक १' (First Preferenfce) ची मते मोजली जातात. समजा, पहिल्या फेरीत सर्व उमेदवारांना मिळालेली मते अशी आहेतः

उमेदवार 'अ' : ४,००० मते
उमेदवार 'ब' : ३,००० मते
उमेदवार 'क' : २,००० मते
उमेदवार 'ड' : १,००० मते
एकूण वैध मते : १०,०००

निकालाचे विश्लेषण : विजयासाठी ५,००१ मते हवी आहेत; पण पहिल्या फेरीत सर्वाधिक ४,००० मते मिळवूनही 'अ' उमेदवार ५,००१ च्या कोट्यापर्यंत पोहोचू शकलेला नाही. त्यामुळे पहिल्या फेरीत कोणीही विजयी ठरत नाही. आता दुसरी फेरी सुरू होते.

पायरी ३: दुसरी फेरी – सर्वात कमी मते असलेल्या उमेदवाराला बाद ठरवणे

दुसऱ्या फेरीत ज्या उमेदवाराला सर्वात कमी 'पसंती क्रमांक १' ची मते मिळाली आहेत, त्याला शर्यतीतून बाहेर (Eliminate) केले जाते.

इथे उमेदवार 'ड' याला सर्वात कमी म्हणजेच १,००० मते मिळाली आहेत. त्यामुळे 'ड' बाद केला जातो.

जर एकापेक्षा जास्त उमेदवारांना समसमान कमी मते मिळाली असतील तर पुढील लगतच्या फेरीत कमी मते पडली असतील त्या उमेदवाराला बाद करण्यात येते.

आता 'ड' ला मिळालेल्या त्या १,००० मतपत्रिका तपासून पाहिल्या जातात की, त्या मतदारांनी 'पसंती क्रमांक २' (Second Preference) कोणाला दिला आहे ?

समजा, 'ड' च्या त्या १,००० मतपत्रिकांचे वर्गीकरण खालीलप्रमाणे झालेः

त्यातील ६०० मतदारांनी त्यांच्या पसंतीक्रमात दुसरा क्रमांक 'अ' ला दिला होता.

त्यातील ३०० मतदारांनी दुसरा क्रमांक 'ब' ला दिला होता.

उरलेल्या १०० मतपत्रिकांवर दुसरा पसंतीक्रम नव्हता किंवा तो अवैध (Invalid) ठरला.

आता ही मते संबंधित उमेदवारांच्या खात्यात जोडली जातातः

उमेदवार 'अ': ४,००० + ६०० (नवीन मते) = ४,६०० मते
उमेदवार 'ब': ३,००० + ३०० (नवीन मते) = ३,३०० मते
उमेदवार 'क': २,००० मते (जैसे थे)

स्थितीः अजूनही कोणालाही ५,००१ चा कोटा मिळालेला नाही ('अ' कडे ४,६०० मते आहेत). त्यामुळे मोजणी तिसऱ्या फेरीत जाते.

पायरी ४ : तिसरी फेरी-अतिशय महत्त्वाची फेरी

तिसऱ्या फेरीत आता उरलेल्या उमेदवारांपैकी ज्याला सर्वात कमी मते आहेत, त्याला बाहेर काढले जाईल.

आता उमेदवार 'क' कडे सर्वात कमी २,००० मते आहेत, त्यामुळे 'क' ला शर्यतीतून बाहेर केले जाते.

आता 'क' च्या त्या २,००० मतपत्रिका तपासल्या जातात आणि पाहिलं जातं की, त्यांच्यावर पुढचा पसंतीक्रम (उदा : दुसरा किंवा तिसरा) कोणाचा आहे.

समजा, 'क' च्या त्या २,००० मतांपैकीः

१,२०० मतांमध्ये पुढची पसंती 'अ' कडे गेलेली आढळली.

५०० मतांमध्ये पुढची पसंती 'ब' कडे गेलेली आढळली.

३०० मते दुसऱ्या कोणालाच पसंती न दिल्याने बाद झाली.

आता ही मते 'अ' आणि 'ब' च्या खात्यात जमा होतातः

उमेदवार 'अ': ४,६०० + १,२०० = ५,८०० मते
उमेदवार 'ब': ३,३०० + ५०० = ३,८०० मते

अंतिम निकालः

आवश्यक असलेला ५,००१ चा कोटा 'अ' ने पार केला आहे! परिणामी, उमेदवार 'अ' ला विजयी घोषित केले जाते.

या आकडेवारीवरून काय स्पष्ट होते?

पहिल्या फेरीत 'अ' कडे फक्त ४,००० मते होती आणि 'ब' कडे ३,०००, तरीही पसंतीक्रमाच्या मतदानामुळे आणि मते हस्तांतरीत (ळ१ंल्लश१ी१) झाल्यामुळे 'अ' चा विजय सुकर झाला. शिक्षक/पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीत म्हणूनच प्रत्येक पसंतीचा (१, २, ३...) कागद आणि मत अत्यंत महत्त्वाचे ठरते. हे विशेष.

एखादा उमेदवार पहिल्या पसंतीचा मतांचा कोटा पूर्ण करू न शकल्यास जेवढी पसंतीक्रमाची मते असतात तेवढी सारी मते मोजावी लागतात. तेवढे करूनही उमेदवाराला मतांचा कोटा पूर्ण करता आला नाही तर सर्व मतांची मोजणी होऊन सर्वाधिक मते मिळालेला उमेदवार विजयी घोषित केला जातो. ही मतमोजणीची प्रक्रीया अधिक वेळ लागणारी आणि तेवढीच सर्वांची उत्कंठा शिगेला पोहोचवणारी आहे. परिस्थितीनूसार यामुळे मतमोजणी प्रक्रीयेला बराच वेळ लागू शकतो. यात शंकाच नाही.

**अनिल आलुरकर**
उपसंचालक (माहिती) विभागीय माहिती कार्यालय, अमरावती.

# १ ते १९ वयोगटातील ९,८३,७०६ मुलांना मिळणार जंतनाशक गोळ्या- डॉ. सतीश कोपुरवाड

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्ह्यातील बालके व किशोरवयीन मुला-मुलींचे आरोग्य सुदृढ राहावे, रक्तक्षयाचे प्रमाण कमी व्हावे आणि शारीरिक व बौद्धिक विकास चांगला व्हावा, या उद्देशाने येत्या २७ ऑक्टोबर २०२६ रोजी राष्ट्रीय जंतनाशक मोहीम राबविण्यात येणार असल्याची माहिती जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश कोपुरवाड यांनी दिली आहे.

या मोहिमेंतर्गत जिल्ह्यातील १ ते १९ वयोगटातील ९,८३,७०६ बालकांना शाळा, अंगणवाडी व सर्व शासकीय आरोग्य संस्थांच्या माध्यमातून एकाच दिवशी जंतनाशक गोळ्यांचे वाटप करण्यात येणार आहे.

जंत संसर्गाचे दुष्परिणाम आणि औषधाचे फायदे – लहान मुले आणि किशोरवयीन मुलांमध्ये आतड्यातील जंतांचा प्रादुर्भाव झाल्यास पोषक तत्वांचे शोषण कमी होणे, रक्तक्षय, अशक्तपणा, भूक मंदावणे तसेच शारीरिक व बौद्धिक वाढ खुंटणे असे गंभीर परिणाम होतात. नियमित जंतनाशक औषधोपचारामुळे हे जंत नष्ट होऊन मुलांचे आरोग्य सुधारते, रोगप्रतिकारक शक्ती वाढते आणि शैक्षणिक प्रगतीला मदत होते.

वाटपाचे नियोजन –

शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांना शाळेच्या माध्यमातून, तर अंगणवाडीत नोंद असलेल्या बालकांना अंगणवाडी केंद्रात गोळ्या दिल्या जातील. शाळा किंवा अंगणवाडीत न जाणाऱ्या पात्र बालकांसाठी आरोग्य संस्थामार्फत व्यवस्था करण्यात आली आहे. या मोहिमेच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी आरोग्य विभाग, शिक्षण विभाग व महिला व बालविकास विभाग यांच्यात समन्वय साधण्यात आला आहे.

ज्या बालकांना २७ ऑक्टोबर रोजी आजारपण किंवा इतर कारणामुळे गोळी घेता आली नाही, त्यांच्यासाठी दि. ३ नोव्हेंबर २०२६ रोजी मॉप-अप दिन आयोजित करण्यात आला आहे.

जिल्ह्यातील सर्व पालकांनी आपल्या पाल्यांना २७ ऑक्टोबर रोजी जवळच्या शाळा, अंगणवाडी किंवा आरोग्य संस्थेत पाठवून मोहिमेत सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश कोपुरवाड यांनी केले आहे.

# जिल्हा बँकेच्या निवडणुकीसाठी सर्वांशी संपर्क साधणार- रणजीतसिंह मोहिते पाटील

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्हा बँकेत आपल्या कार्यकाळात ठेवी दुप्पट, गुंतवणूकीत तिप्पट वाढ तर राज्यात सर्वात जास्त म्हणजे ६०० कोटींची कर्जमाफीचा सुमारे सव्वादोन लाख शेतकऱ्यांना लाभ झाला असल्याचे सांगत जिल्ह्यात सहकारी संस्थेची निवडणूक ही पक्षीय पातळीवर लढवली जात नसून याच परंपरेनुसार आपण सर्वांशी संपर्क साधून जिल्ह्याची घडी पूर्ववत करण्याचा प्रयत्न करणार असल्याचे मत माजी आमदार रणजीतसिंह मोहिते पाटील यांनी व्यक्त केले.शिवरत्न बंगल्यावर सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीच्या अनुषंगाने माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली विचारविनिमय बैठक आयोजित करण्यात आली होती यावेळी ते बोलत होते. यावेळी खासदार धैर्यशील मोहिते पाटील, आमदार अभिजीत पाटील, धनाजी साठे, ज्येष्ठ नेते लक्ष्मणराव ढोबळे, सविताराजे भोसले, देवानंद बागल, शिवानंद पाटील, अनिकेत देशमुख, प्रथमेश म्हेत्रे, शिवानंद पाटील यांच्यासह जिल्हाभरातील सर्व तालुक्यातील प्रमुख नेते मंडळी व कार्यकर्ते उपस्थित होते.




सोमवार दिनांक 26 पासून निवडणूक प्रक्रिया चालू होत असून इच्छुकांनी आपली नावे नोंदवावीत असे आवाहन खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांनी केले. सर्वच वक्त्यांचा आपल्या भाषणातून रणजीतदादा व धैर्यशील भैय्या यांनी आता मैदानात उतरून पुन्हा एकदा जिल्ह्यात आपली ताकद दाखवण्याची वेळ आलेली आहे असा सुरू उमटला.

मोहिते पाटील पुढे म्हणाले, जिल्हा बँकेच्या माध्यमातून पंढरपूर येथे तीस एकर मैदानात केशर मातीचे प्रदर्शन भरवले त्यासाठी सव्वा ते दीड कोटी रुपये खर्च झाला असला तरी केवळ बारा ते तेरा लाख बँकेचे खर्च झाले असून बाकीचे सव्वा ते दीड कोटी रक्कम आपण इतर माध्यमातून उपलब्ध केल्याची त्यांनी सांगितले.

यावेळी जिल्हाभरातून आलेल्या विविध नेत्यांनी मनोगते व्यक्त केली.यामध्ये बाळासाहेब पाटील यांनी आपले वडील भाई एस एम पाटील यांनी स्वतःसाठी अथवा संस्थेसाठी एकही रुपया घेतलेला नव्हता. त्यावेळी दिलेल्या कर्जाची वसुली चालू असतानाही संचालक म्हणून लांचनास्पद आरोप केले, गेल्याचे सांगत मोहिते पाटील यांनी पॅनल उभा करावे, आम्ही त्यांच्या पाठीशी असल्याचे सांगितले.यावेळी तेजस बोबडे पंढरपूरचे तळेकर, सिद्धेश्वर सहकारीचे माजी संचालक भारत जाधव, मंगळवेढ्याचे भारत पाटील, करमळ्याचे दशरथ कांबळे, ॲड दीपक पवार, शिवानंद पाटील, डॉक्टर अनिकेत देशमुख, बार्शीचे विश्वास बारबोले, जेष्ठ नेते लक्ष्मणराव ढोबळे, आदींनी मनोगते व्यक्त केली, माजी आमदार धनाजी साठे यांनी जिल्ह्याची घरी पूर्वत बसण्यास बसविण्यासाठी योग्य रीतीने प्रयत्न करून निवडणूक लढवावी असे मार्गदर्शन केले. तर आमदार अभिजीत पाटील यांनी जिल्हा बँकेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत अधिकाऱ्यांनी तफावत असणारे आकडे सादर केल्याचे सांगून जिल्हा बँक शेतकऱ्यांचीच राहावी असे वाटत असल्यास सर्वांनी पक्ष भेद विसरून एकत्र येणे गरजेचे असल्याचे सांगितले. यावेळी सर्वांनी मोहिते पाटील यांनी संपूर्ण पॅनेल उभा करून डीसीसीची निवडणूक लढवावी असे मत व्यक्त केले.

# तुळजाभवानीच्या भक्तांसाठी दोन दशकांची अखंड सेवा शिरापूरच्या चव्हाण परिवाराचा स्त्री शक्तीचा जागर

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** अनवाणी पायाने शेकडो किलोमीटर चालणाऱ्या भाविकाला माऊलीच्या मायेने हाक मारून गरम चहा, नाश्ता पुढे करणे हीच खरी ईश्वरसेवा. हीच भावना जपत शिरापूरच्या चव्हाण परिवाराने गेल्या २० वर्षांपासून मानवतेचा यज्ञ अखंड तेवत ठेवला आहे.

कोजागिरी पौर्णिमेनिमित्त तुळजापूरला पायी जाणाऱ्या भाविकांसाठी शिरापूर (सो) येथील उजनी कॅनॉल च्या डीपकटजवळ चव्हाण परिवाराच्या वतीने लावण्यात येणाऱ्या चहा, नाश्ता आणि औषधोपचार स्टॉलचे यंदाचे हे २० वे वर्ष आहे.

यंदाच्या या स्टॉलचे उदघाटन शिरापूर पंचायत समितीच्या सदस्या नीलम मसलकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी चव्हाण परिवारातील सर्व महिलांची उपस्थिती हीच खरी स्त्री शक्तीचा जागर ठरली.



माळशिरस ते सांगोला, हजारो भाविकांचा विसावा शिरापूरातच.

सोलापूर जिल्ह्यातील माळशिरस, करमाळा, माढा, पंढरपूर, मंगळवेढा, सांगोला या तालुक्यांमधून लांबोटी-शिरापूर-मोरवंची-रानमसले वडाळा केमवाडी काठी सावरगाव सांगवी मार्गे तुळजापूरला जाणाऱ्या हजारो भाविकांसाठी शिरापूर हे हक्काचे थांब्याचे ठिकाण बनले आहे.

२००६ साली सुरू झालेला हा उपक्रम आज मोठ्या वटवृक्षात रूपांतरित झाला आहे.

करिता प्रशांत कुंभार, तात्या आरेकर आणि समस्त शिरापूर ग्रामस्थांच्या सहकार्याने येथे भाविकांना चहा, दूध, मसाला दूध, कॉफी, नाश्ता आणि औषधोपचाराची सुविधा मोफत दिली जाते. दरवर्षी २० ते ३० हजार भाविक या सेवेचा लाभ घेतात, अशी माहिती मच्छिंद्र चव्हाण यांनी दिली.

"वेळ बदलल्या, पिढ्या बदलल्या तरी सेवा खंडित होणार नाही," असा निर्धार ज्येष्ठ पत्रकार कृष्णकांत चव्हाण यांनी यावेळी व्यक्त केला.

## बरस रे मेघा

धरिता तिफण,केलीय पेरणी
काळ्या या आईची,ओटीची भरणी

बिया ही रुजल्या,धरणी फाटली
नवं चैतन्याने,धरती नटली

निसर्गाचा दगा,पाऊस लांबला
फुलांचा बहर,मग तो थांबला

बसला रुसून,पाऊस ढगात
पीक करपता,अश्रू नयनात

झालास पावसा,निष्ठूर तू किती
निस्तेज चेहरे,गुंग झाली मती

पिकांचे सापळे,उभे वावरात
पेटे मग डोंब,देह देव्हाऱ्यात

शेताला पाहुनी,पीळ आतड्याला
कोणते हे भोग,आले रे भोगाला

सोड रे पावसा,तुझा हा रुसवा
निसर्ग टाकतो,डाव हा फसवा

किती मी विणवू,करू नको त्रागा
बरस रे मेघा,फुलू दे रे बागा

मातीला भेटण्या,जेव्हा येशी खाली
तेव्हाच कळेल,वास्तव खुशाली



श्री.युवराज गोवर्धन जगताप
काटेगाव ता :- बार्शी
जिल्हा :- सोलापूर
8275171227

पान १ वरून

# क्लिपमागचं सत्य शोधून दाखवा ...

येण्याऐवजी वेगळ्याच चर्चांना वाव मिळेल, असा दावा त्यांनी केला.

जरांगे यांनी पुढे म्हटलं की, मराठा समाजातील लोकांनी एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस यांच्यासाठी काम केलं, त्यांना मतदान देखील केलं.

त्यामुळे मराठा आंदोलन मोडण्याचा प्रयत्न कोणी केला, याचा शोध घेणं आणि सत्य जनतेसमोर आणणं ही त्यांची जबाबदारी आहे. आंदोलन चिरडण्याचा कथित प्रयत्न ांमागचं सत्य उघड करण्याऐवजी संबंधितांना वाचवलं जात असेल, तर समाजाच्या मनात संशय निर्माण होणार नाही का, असा सवाल देखील त्यांनी उपस्थित केला.

या प्रकरणात पडद्यामागे पुन्हा काही हालचाली सुरू असल्याची शक्यता जरांगे यांनी व्यक्त केली. मात्र, ठोस पुरावे समोर आल्यानंतरच आपण अधिक बोलू, असं देखील त्यांनी स्पष्ट केलं. या कथित ऑडिओ क्लिपमुळे संबंधित नेत्यांच्या विश्वासार्हतेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो, असं मत त्यांनी व्यक्त केलं.

दरम्यान, या प्रकरणाची सत्यता तपासण्यासाठी फडणवीस यांनी एसआयटीच्या माध्यमातून फॉरेन्सिक तपासाकडे लक्ष द्यावं, अशी अपेक्षा जरांगे यांनी व्यक्त केली. एकनाथ शिंदे यांनी देखील या तपासाकडे लक्ष द्यावं, असं ते म्हणाले.

दूध का दूध आणि पाणी का पाणी झालं पाहिजे, अशी भूमिका मांडत या कथित ऑडिओ क्लिपमागचं सत्य निष्पक्षपणे बाहेर आणण्याची मागणी त्यांनी केली.

सत्य काय आहे, हे जनतेसमोर आलंच पाहिजे. ते खरं ठरवायचं की खोटं, यापेक्षा सत्य शोधणं महत्वाचं आहे. मी पुरावे समोर आल्यानंतर बोलेन, पण सत्य समाजासमोर आणण्याची भूमिका कायम ठेवणार, असा इशारा देखील मनोज जरांगे पाटील यांनी दिला. या कथित ऑडिओ क्लिपची सत्यता आणि त्यातील दाव्यांची स्वतंत्र पुष्टी होणं महत्वाचं असून, आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे या आव्हानांवर काय भूमिका घेतात, याकडे राजकीय वर्तुळाचं लक्ष लागलं आहे.

# दुचाकी खरेदीवेळी हेल्मेट मिळणे आवश्यक नियमांचे पालन करण्याचे परिवहन विभागाचे आवाहन

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** जिल्ह्यात रस्ते अपघातांचे प्रमाण लक्षात घेता दुचाकीस्वारांनी हेल्मेटचा वापर करणे अत्यंत आवश्यक आहे. दुचाकी वाहन खरेदी करताना ग्राहकांना नियमानुसार हेल्मेट उपलब्ध करून देण्याच्या तरतुदींचे सर्व विक्रेते व डीलर्स यांनी काटेकोर पालन करावे, असे आवाहन उपप्रादेशिक परिवहन अधिकारी विजय पाटील यांनी केले आहे.

रस्ते अपघातांमध्ये डोक्याला गंभीर दुखापत होण्याचा धोका कमी करण्यासाठी दुचाकी चालकासह सहप्रवाशानेही योग्य दर्जाचे हेल्मेट वापरणे आवश्यक आहे. हेल्मेटचा वापर केवळ कायदेशीर बंधन म्हणून न पाहता स्वतःच्या जीविताच्या संरक्षणासाठी महत्त्वाची बाब म्हणून पाहावे, असेही परिवहन विभागाने स्पष्ट केले आहे.

### नागरिकांनी खरेदीवेळी हेल्मेटची खात्री करावी

नवीन दुचाकी वाहन खरेदी करताना ग्राहकांनी संबंधित विक्रेत्याकडून नियमानुसार हेल्मेट मिळत असल्याची खात्री करावी. हेल्मेट भारतीय मानक ब्युरोच्या (BIS) निर्धारित मानकांनुसार प्रमाणित असल्याची तपासणी करावी.

हेल्मेटसाठी स्वतंत्रपणे अतिरिक्त रक्कम आकारली जात असल्यास संबंधित बिल व पावती जतन करून ठेवावी. वाहन विक्रेत्याकडून लागू नियमांचे पालन होत नसल्याचे निदर्शनास आल्यास आवश्यक पुराव्यांसह प्रादेशिक परिवहन कार्यालय, सोलापूर येथे तक्रार नोंदवावी.

### विक्रेत्यांनी नियमांचे काटेकोर पालन करावे

सर्व दुचाकी वाहन विक्रेते व डीलर्स यांनी नवीन वाहन विक्रीच्या वेळी ग्राहकांना हेल्मेट उपलब्ध करून देण्यासंबंधीच्या लागू कायदेशीर तरतुदींचे पालन करावे. ग्राहकांना BIS/ISI प्रमाणित हेल्मेट उपलब्ध करून देतानाच हेल्मेट दिल्याची पावती अथवा आवश्यक पुरावा जतन करावा. वाहन विक्री व्यवहार, हेल्मेट, ॲक्सेसरीजची बिले व संबंधित कागदपत्रांच्या नोंदी व्यवस्थित ठेवाव्यात. ग्राहकांना हेल्मेट देण्यास नकार देणे किंवा संबंधित नियमांचे उल्लंघन करणे टाळावे.

लागू कायदे व नियमांचे उल्लंघन निदर्शनास आल्यास प्रचलित कायद्यातील तरतुदींनुसार सक्षम प्राधिकाऱ्यामार्फत आवश्यक कार्यवाही करण्यात येईल, असा इशाराही परिवहन विभागाने दिला आहे.

### रस्ता सुरक्षा ही सर्वांची जबाबदारी

दुचाकीस्वारांनी स्वतःच्या तसेच सहप्रवाशाच्या सुरक्षिततेसाठी प्रत्येक प्रवासात योग्य हेल्मेटचा वापर करावा. नागरिक, वाहन विक्रेते व डीलर्स यांनी रस्ता सुरक्षा नियमांचे पालन करून अपघातांमधील जीवितहानी कमी करण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन उपप्रादेशिक परिवहन अधिकारी विजय पाटील यांनी केले आहे.

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# अमोलराजे भोसले मित्र मंडळ व परिवार यांच्यावतीने भाविकांना प्रसाद वाटपाचा शुभारंभ

**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):-** श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली अमोलराजे भोसले मित्र मंडळ व परिवार अक्कलकोट यांच्यावतीने श्री तुळजा भवानी मातेच्या दर्शनास जार्णाया भाविकांना प्रसाद वाटपाचा शुभारंभ विविध मान्यवरांच्या हस्ते शुक्रवारी सायंकाळी वळसंग टोल नाका येथे करण्यात आले. यंदाचे २६ वे वर्ष आहे.



याप्रसंगी नगराध्यक्ष मिलन कल्याणशेट्टी,श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान अध्यक्ष, जेष्ठ नगरसेवक महेश इंगळे, शिवसेना जिल्हा प्रमुख अमोलबापू शिंदे, माजी उपमहापौर दिलीप कोल्हे, सागर पिसे, वळसंग सरपंच जगदीश आंटद, वळसंग पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक राहुल डोंगरे, नगरसेवक अविनाश मडीखांबे, नन्नू कोरबू, पुरंदर पंचायत समिती सभापती दादासाहेब घाटे, पुणे येथील उद्योगपती सुशील देशमुख, बालाजी पवार, दिनकर नारायणकर, संजय गायकवाड, महादेव होटकर, अनिल बर्वे, वीरेश बागलकोटे, मनोज थळंगे, विनायक सुरपुरे, विश्वनाथ मोटगी, सिद्धारुढ काळे, श्रीशैल भूसुनगी, यासीन कुरेशी, ओमशंकर हुलगेरी आदींच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. दरम्यान श्री स्वामी समर्थ, श्री अन्नपूर्णा माता, श्री तुळजाभवानी प्रतिमेचे पूजन मुख्य पुरोहित अप्पू पुजारी, संजय कुलकर्णी यांच्या मंत्र पठणाने मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी शेकडो देवीभक्त उपस्थित होते.

यावेळी न्यासाचे उपाध्यक्ष- अभय खोबरे, सचिव- शामराव मोरे काका, खजिनदार लाला राठोड, विश्वस्त भाऊ कापसे, पालखी परिक्रमा मुख्य संयोजक संतोष भोसले, दिलीपभाऊ सिद्धे,प्रथमेश इंगळे, कु. हर्षवर्धनराजे अमोलराजे भोसले, कु.स्वामिनीराजे अमोलराजे भोसले, रोहन लेंगडे-बेंगलोर, प्रा.सायबन्ना जाधव, बाळासाहेब कुलकर्णी, अशपाक काझी, मनोज निकम, सिद्धेश्वर मोरे, बाळासाहेब पोळ, संजय गोंडाळ, पिंटू दोडमनी, श्रीशैल शाली, शिव मंगरुळे, शिवराज स्वामी, रुद्रय्या स्वामी, अभिषेक लोकापुरे, चंद्रकांत सोनटक्के, सौरभ मोरे, रोहित खोबरे, सनी सोनटक्के, वैभव मोरे, निखिल पाटील, योगेश चनशेट्टी, रोहित मोरे, श्री पोतदार, वासू कडबगावकर, स्वप्निल मोरे, सिद्धाराम धत्तरगी, राजशेखर हिरेमठ, तम्मा मोकाशी, केशव भगत, कांत झिपरे, भरत राजेगावकर, रोहन शिर्के, प्रवीण देशमुख, शुभम सावंत, ॲड. फहिम पिरजादे, सिद्धेश्वर माळी, दिनेश बंडगर, योगेश कटारे, प्रवीण घाटगे, अतिश पवार, प्रशांत शिंदे-साठे, टिंकू कलशेट्टी, विशाल कलबुर्गी, गोटू माने, आकाश शिंदे, योगेश पवार, समर्थ घाटगे, सागर गोंडाळ, राजू रंगदाळ, आकाश सुर्यवंशी, दादा पवार, प्रसाद मोरे, श्री गुरव, अमर मसरे, किरण साठे, गणेश पाटील, दादा पवार, प्रथमेश पवार, अमर शिरसाट, सुमित घाटगे, सुमित कल्याणी, चंद्रकांत कुंभार, श्री चव्हाण, स्वामिनाथ बाबर, गोविंदराव शिंदे, संजय शिंदे, यासीन पटेल, कुमार पाटील, विलास राठोड, बाळासाहेब घाटगे, मल्लिकार्जुन बिराजदार,दत्ता माने, श्रीनिवास गवंडी, लक्ष्मण बिराजदार, प्रसन्न बिराजदार, रमेश हेगडे, तानाजी पाटील, राजू पवार, महांतेश स्वामी, सुमित कल्याणी, पृथ्वीराज पोळ, राजू म्हेत्रे, गिरीश गवळी,मुन्ना महाडिक, नामा भोसले, पिंटू हळ्ळूरे, कल्लप्पा छकडे, राजू शिंदे, ज्योतिबा पवार, श्रीकांत सोमवंशी, गणेश भोसले, ज्ञानेश्वर भोसले, बलभीम पवार, श्रीशैल कुंभार, राहूल इंडे, सागर पवार, असद फुलारी, श्रीमंत पुजारी, स्वामीनाथ गुरव, कन्नय्या झंपले, बिरप्पा व्हनझेंडे, महांतेश स्वामी, विशाल घाटगे, समर्थ चव्हाण, विठ्ठल रेड्डी, यांच्यासह या कार्यक्रमास समस्त विश्वस्त मंडळ, क्रियाशील सदस्य, कार्यकर्ते, व सेवेकरी, देवीभक्त उपस्थित होते. कार्यक्रमाचे स्वागत, प्रास्ताविक महादेव होटकर-वळसंग यांनी केले. सूत्रसंचालन व आभार प्रा. शिवशरण अचलेर यांनी केले.

# जिंकणारा खेळाडू आनंद देतो व पराभवातून शिकणारा खेळाडू इतिहास घडवतो- मालोजीराजे देशमुख

**नातेपुते (कटूसत्य वृत्त):-** कराटे ही केवळ स्वसंरक्षणाची कला नाही, तर ती शारीरिक आणि मानसिक विकास घडविणारी एक प्रभावी जीवनशैली आहे. प्रतिस्पर्ध्याला सन्मान द्या आणि खिलाडूवृत्ती जपा. तुमचे खरे यश केवळ पदकात नसून तुमच्या शिस्तीत, मेहनतीत आणि चारित्र्यात आहे.जिंकणारा खेळाडू आनंद देतो व पराभवातून शिकणारा खेळाडू इतिहास घडवितो असे मत एस.एन.डी.स्कूलचे चेअरमन मालोजीराजे देशमुख यांनी व्यक्त केले.



ते नातेपुते येथे जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय जिल्हा क्रीडा परिषद सोलापूर व एस एन डी इंटरनॅशनल सीबीएसई स्कूल नातेपुते यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आलेल्या माळशिरस तालुका स्तरीय शालेय कराटे स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होते. ते पुढे बोलत असताना म्हणाले की,खेळाडूंनो, स्पर्धेत विजय मिळवणे महत्त्वाचे आहेच; परंतु पराभव स्वीकारून त्यातून शिकणे हे त्याहून अधिक महत्त्वाचे आहे. आज तुम्ही जिंकलात तर तुमच्या यशाचा आनंद साजरा करा आणि पराभूत झालात तर निराश न होता अधिक मेहनत करण्याचा संकल्प करण्याचा सल्ला कराटे खेळाडू यांना मालोजीराजे देशमुख यांनी दिला. यावेळी एस एन डी स्कूलचे सेक्रेटरी रोहित शेटे तसेच शक्ती पलंगे इमाम मुलानी मुख्याध्यापक संदीप पानसरे सोलापूर जिल्हा स्पोर्ट असोसिएशनचे अध्यक्ष गौतम वाघमारे सचिव मनोज राऊत उपस्थित होते. यावेळी मालोजीराजे देशमुख व मान्यवरांच्या शुभहस्ते दीप प्रज्वलन व स्पर्धकांची फाईट लावून उद्घाटन करण्यात आले. माळशिरस तालुक्यातील अनेक शाळांमधील विद्यार्थी विद्यार्थिनी सहभागी झाले होते. स्पर्धा १४, १७ आणि १९ वर्षांखालील वयोगटांमध्ये घेण्यात आल्या. असून सदर स्पर्धा नातेपुते येथील राजवैभव सांस्कृतिक भवन येथे पार पडल्या या स्पर्धेसाठी पंच व परीक्षक म्हणून गौतम वाघमारे, सुनील वाघमारे, यजवेंद्र चौधरी, मयंक स्वामी आणि मनोज राऊत यांनी काम पाहिले. स्पर्धा नियोजनबद्ध आणि शिस्तबद्ध पद्धतीने पार पाडण्यासाठी माळशिरस तालुक्यातील क्रीडा शिक्षकांचे मोलाचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दादासाहेब धोपे यांनी केले. स्पर्धेचे प्रास्ताविक मनोज राऊत यांनी केले, तर प्रकाश काशीद यांनी उपस्थित मान्यवर, क्रीडा शिक्षक, पंच, परीक्षक आणि सहभागी खेळाडूंचे आभार मानले.

स्पर्धा पाहण्यासाठी कराटे खेळाडूंचे अनेक पालक व प्रेक्षक उपस्थित होते.या स्पर्धेमुळे तालुक्यातील शालेय खेळाडूंना आपले कौशल्य दाखविण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध झाले असून, अशा उपक्रमांमुळे ग्रामीण भागातील कराटे खेळाला चालना मिळेल आणि गुणवंत खेळाडूंना जिल्हास्तरावर चमकण्याची संधी मिळेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

# नेत्रालयामुळे माढा तालुक्याच्या आरोग्य क्षेत्रातील वैभवात भर - बबनराव शिंदे

**माढा (कटूसत्य वृत्त):-** माढा तालुक्यासह जिल्ह्यात एकही मोतिबिंदूचा रुग्ण राहू नये. नेत्ररुग्णांची माफक दरात तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्याच्या उद्देशाने उभारण्यात आलेले सुसज्ज व अद्ययावत स्वरूपाचे तीन मजली नेत्रालयामुळे माढा तालुक्याच्या आरोग्य क्षेत्रातील वैभवात भर पडल्याचे प्रतिपादन माढेश्वरी अर्बन बँकेचे चेअरमन माजी आमदार बबनराव शिंदे यांनी केले आहे.




ते माढा येथील संकल्प फाऊंडेशन संचलित,कर्मयोगी आमदार बबनदादा शिंदे नेत्रालयास प्रथमच सदिच्छा भेट दिल्यानंतर बोलत होते.

पुढे माजी आमदार बबनराव शिंदे यांनी सांगितले की, मागील 17 वर्षापासून माढा शहरात मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबीराचे यशस्वी आयोजन केले आहे.या माध्यमातून सुमारे 23 हजार जणांची मोफत नेत्र तपासणी व 7700 हून अधिक रुग्णांच्या मोतिबिंदू शस्त्रक्रिया यशस्वी केल्या आहेत.याकामी नेत्ररोगतज्ञ पद्मश्री डॉ.तात्याराव लहाने,डॉ. रागिणी पारेख,डॉ. एकनाथ शेळके,डॉ.गणेश इंदूरकर यांचे मोलाचे सहकार्य लाभले आहे.सध्याच्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या व मोबाईलच्या युगात सातत्याने नेत्ररोग व नेत्ररुग्णांची संख्या वाढत आहे त्यामुळे ग्रामीण भागातील गोरगरीब व गरजू रुग्णांची मोतिबिंदू शस्त्रक्रिया वेळेवर करता आली नाही म्हणून दृष्टीहीन होऊ नये यासाठी हे सुसज्ज व अद्ययावत तीन मजली नेत्रालय कार्यान्वित केले आहे.त्यांनी यावेळी अल्पावधीतच नेत्रालयाची उभारणी केल्याबद्दल कौतुक केले.

यावेळी संकल्प फाऊंडेशनचे अध्यक्ष अशोक लुणावत यांनी सांगितले की, माजी आमदार बबनदादा शिंदे यांचे स्वप्न होते की, मतदारसंघात एक अद्ययावत रुग्णालय उभे करावे.त्यांचे हे स्वप्न सत्यात उतरवण्यासाठी आम्ही सर्वांनी विशेष प्रयत्न करुन अवघ्या 10 महिन्यात तीन मजली नेत्रालयाची उभारणी केली असून सर्व प्रकारच्या आधुनिक व अद्ययावत मशिनरी या ठिकाणी रुग्णांच्या सेवेसाठी उपलब्ध असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी संकल्प फाऊंडेशनचे सचिव निलेश कुलकर्णी, पुरोहित बापू कुंभेजकर,स्वीय सहाय्यक नितीन मराठे, समाधान भांगे,अक्षय कवटे सुरेश कुबेर,प्रीती घळके, सुमन पाटोळे,छबुबाई पाटोळे,जयश्री शिंदे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

# सिंहगड इन्स्टिट्यूटतर्फे सोलापूर श्रमिक पत्रकार संघाच्या नूतन पदाधिकाऱ्यांचा सत्कार

**सोलापूर(कटूसत्य वृत्त):-** सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळ संचलित एन. बी. नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालय आणि सिंहगड पब्लिक स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, केगाव यांच्या वतीने व संस्थेचे सहसचिव संजय नवले यांच्या पुढाकाराने सोलापूर श्रमिक पत्रकार संघाच्या सन २०२६-२७ च्या नूतन कार्यकारिणीचा सत्कार करण्यात आला. शनिवारी (दि. १७ ऑक्टोबर) महाविद्यालय परिसरात हा कार्यक्रम पार पडला.




यावेळी प्राचार्य डॉ. शंकर नवले यांच्या हस्ते संघाचे अध्यक्ष विक्रम खेलबुडे, सरचिटणीस आफताब शेख, खजिनदार विजय गायकवाड, उपाध्यक्ष नितीन पात्रे, संगमेश जेऊरे, रुपेश हेळवे, चिटणीस लखन आदाटे, सहचिटणीस रोहित थळवे, कार्यकारिणी सदस्य रवींद्र दंतकाळे, श्रीनिवास मावनूर, गौतम गायकवाड, सचिन जाधव, अंबादास पोळ, आरती कुसेकर, महेश कुलकर्णी आणि सागर इप्पलपल्ली यांचा सत्कार करण्यात आला.

शैक्षणिक संस्था आणि प्रसारमाध्यमांमधील संबंध अधिक दृढ करण्याच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरला. यावेळी पत्रकार संघाचे अध्यक्ष विक्रम खेलबुडे यांनी सिंहगड इन्स्टिट्यूट आणि सोलापूर श्रमिक पत्रकार संघ यांच्या संयुक्त विद्यमाने पत्रकारांसाठी कार्यशाळा आयोजित करण्याचा मानस व्यक्त केला. याला सिंहगड संस्थेने सकारात्मक प्रतिसाद दिला.

प्रसारमाध्यमांसाठी उपयुक्त उपक्रम राबविण्यास कॅम्पस डायरेक्टर संजय नवले नेहमीच तत्पर असतात. त्यामुळे पत्रकार संघाच्या सहकार्याने संयुक्त कार्यशाळा आयोजित करण्यात येईल, असे आश्वासनही यावेळी देण्यात आले.

या कार्यक्रमास सोलापूर श्रमिक पत्रकार संघाचे पदाधिकारी व कार्यकारिणी सदस्य तसेच सिंहगड इन्स्टिट्यूटचे जनसंपर्क अधिकारी रामकृष्ण लांबतुरे उपस्थित होते.

# टेंभुर्णीत एमडी ड्रग्जसह ११.६१ लाखांचा मुद्देमाल जप्त

**टेंभुर्णी (कटूसत्य वृत्त):-** टेंभुर्णी शहरातील पुणेझसोलापूर महामार्गावरील कुडुर्वाडी पुलाजवळील सर्व्हिस रोडवर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने गुरुवारी (दि. २२ ऑक्टोबर) दुपारी कारवाई करत ५.५२ ग्रॅम वजनाचा मेफेड्रोन (एमडी) हा अमली पदार्थ जप्त केला. या कारवाईत अमली पदार्थासह कार, दोन मोबाईल फोन, डिजिटल वजनकाटा, रोख रक्कम आणि प्लास्टिकच्या रिकाम्या पिशव्या असा एकूण ११ लाख ६१ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी गौतम अजित भोसले (वय ३८, रा. वेणेगाव) याच्याविरुद्ध टेंभुर्णी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गुरुवारी दुपारी तीनच्या सुमारास पुणेझसोलापूर महामार्गावरील कुडुर्वाडी पुलाजवळील सर्व्हिस रोडवर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने ही कारवाई केली. संशयित गौतम भोसले याच्याकडे ५.५२ ग्रॅम वजनाचा मेफेड्रोन हा अमली पदार्थ आढळून आला. पोलिसांनी केलेल्या कारवाईत १६ हजार ५०० रुपये किमतीचा मेफेड्रोन, एक लाख २० हजार रुपये किमतीचा मोबाईल, १० हजार रुपये किमतीचा आणखी एक मोबाईल, एक हजार रुपये किमतीचा डिजिटल वजनकाटा, १४ हजार रुपये रोख रक्कम, दहा लाख रुपये किमतीची कार आणि प्लास्टिकच्या रिकाम्या पिशव्या असा एकूण ११ लाख ६१ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस कॉन्स्टेबल बाळराजे घाडगे यांनी फिर्याद दिली. त्यानुसार टेंभुर्णी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, या प्रकरणाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक मुळे, स्थानिक गुन्हे शाखा, सोलापूर ग्रामीण करीत आहेत.

# 'उंच ध्येय ठेवा, अपयशातून शिका व स्वत:च्या संधी स्वत: निर्माण करा'- पद्मविभूषण डॉ. रघुनाथ माशेलकर

## एमआयटी विश्वप्रयाग युनिव्हर्सिटीचा पहिला दीक्षांत समारंभ उत्साहात संपन्न

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** 'विद्यार्थ्यांनी आपल्या स्वप्नांना भौगोलिक किंवा परिस्थितीजन्य मयादांचे बंधन घालू नये. तुमचा जन्म कुठे झाला, यावर तुमचे अंतिम ध्येय ठरत नाही. स्वप्ने मोठी ठेवा, ती साकार करण्यासाठी कठोर परिश्रम, चिकाटी व ध्येयाप्रती निष्ठा ठेवावी. आयुष्यभर शिकत राहा आणि स्वतःसाठीच नव्हे, तर इतरांसाठीही संधी निर्माण करा.ह्व असे विचार ज्येष्ठ शास्त्रज्ञ, पद्मविभूषण डॉ. रघुनाथ माशेलकर यांनी मांडले. केगाव, सोलापूर येथील एमआयटी विश्वप्रयाग युनिव्हर्सिटीच्या पहिल्या दीक्षांत समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माईर्स एमआयटी शिक्षण समूहाचे संस्थापक अध्यक्ष व कुलपती प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड होते, तर बालाजी अमाइन्सचे व्यवस्थापकीय संचालक राम रेड्डी सन्माननीय अतिथी म्हणून उपस्थित होते.



या समारंभात बीसीए, एमबीए आणि एमसीए या अभ्यासक्रमांतील एकूण ९० विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करण्यात आली, तर शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या सात गुणवंत विद्यार्थ्यांना गुणवत्ता प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. यावेळी एमआयटी विश्वप्रयाग युनिव्हर्सिटीच्या कार्यकारी अध्यक्षा प्रा. स्वाती कराड चाटे, कुलगुरू प्रा. गोपाळकृष्ण जोशी, प्र-कुलगुरू डॉ. विद्या निरंजन, बेंगळुरू येथील बायोवेट प्रा. लि. चे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. एन. एस. श्रीनाथ, जेआयटीच्या सेंटर फॉर इनक्युबेशन, इनोव्हेशन, रिसर्च अँड कन्सल्टन्सी' (CIIRC) चे संचालक डॉ. कृष्णा व्यंकटेश, कुलसचिव प्रा. प्राणेश मुरनाळ, परीक्षा नियंत्रक प्रा. प्रभा कासलीवाल, संचालक राघवेंद्र मुकुंदराज चाटे आणि विविध शाखांचे अधिष्ठाता यांच्या उपस्थितीत हा समारंभ पार पडला.

पुढे बोलताना डॉ. माशेलकर म्हणाले 'शिक्षणाकडे केवळ पदवी मिळविण्याचे साधन म्हणून न पाहता, भविष्य घडविण्याची आणि समाजात सकारात्मक परिवर्तन घडविण्याची संधी म्हणून पाहावे. उत्कृष्टतेचा ध्यास घेऊन कमी साधनांतून अधिकाधिक लोकांसाठी मूल्य निर्माण करावे. तंत्रज्ञानासोबत विवेकबुद्धी, सहानुभूती व प्रामाणिकपणाची जोपासना करावी', असा संदेश त्यांनी पदवीधर विद्यार्थ्यांना दिला.

आपल्या अध्यक्षीय भाषणात प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड यांनी 'शिक्षणाचे अंतिम उद्दिष्ट ज्ञान, चारित्र्य आणि मानवतेची सेवा आहे. संत ज्ञानेश्वरांच्या वैश्विक तत्त्वज्ञानाचा वारसा घेऊन विद्यार्थ्यांनी विश्वाच्या कल्याणासाठी कार्य करावे आणि समाजाप्रती आपले उत्तरदायित्व निष्ठेने पार पाडावे, असे आवाहन केले.

समारंभाचे सन्माननीय अतिथी राम रेड्डी यांनी उद्योगक्षेत्रातील बदलत्या गरजांच्या पार्श्वभूमीवर 'विद्यार्थ्यांनी ज्ञानासोबत प्रॅक्टिकल नॉलेज, प्रभावी संभाषण आणि बहु-कौशल्ये आत्मसात करणे काळाची गरज बनली आहे. कार्यक्षेत्रातील सकारात्मक दृष्टिकोनच विद्यार्थ्यांना भविष्यात यशस्वी बनवतो." असे प्रतिपादन केले.

कार्यकारी अध्यक्षा प्रा. स्वाती कराड-चाटे पदवीधरांचे अभिनंदन करताना म्हणाल्या 'दृढ निश्चय, समर्पण आणि प्रामाणिकपणाच्या बळावर जीवनातील कोणत्याही प्रतिकूल परिस्थितीवर मात करता येते.

एआयच्या युगात 'शिका, जुने विसरा आणि पुन्हा नव्याने शिका' ही वृत्ती अंगीकारल्यास कोणतेही तंत्रज्ञान मानवाला कालबाह्य ठरवू शकत नाही. मात्र, यशाच्या शिखरावर पोहोचताना विद्यार्थ्यांनी आपल्या मुळांशी असलेली नाळ कधीही तोडू नये. विज्ञानासोबत निसगार्चे रक्षण आणि सर्व सजीवांचे सहअस्तित्व जपणे, हीच खरी शाश्वत प्रगती आहे.'कुलगुरू प्रा. गोपाळकृष्ण जोशी म्हणाले "एमआयटी विश्वप्रयाग युनिव्हर्सिटी दजेर्दार शिक्षण, नवोन्मेष आणि स्टार्टअप्सच्या बळावर सोलापूरच्या सामाजिक-आर्थिक विकासाला नवी गती देत आहे. पर्यावरणपूरक संकुल, मियावाकी जंगल आणि जलसंधारणाच्या माध्यमातून सामाजिक बांधिलकी जपत, स्थानिक गरजांना जागतिक दर्जाच्या शिक्षणाची जोड देऊन सोलापूरला उत्कृष्ट ज्ञानकेंद्र बनवण्यासाठी विद्यापीठ कटिबद्ध असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले." समारंभाच्या सुरुवातीला प्रा. प्रभा कासलीवाल यांनी मान्यवरांचे स्वागत केले, प्रा. रूपाली धामणे यांनी सूत्रसंचालन केले आणि कुलसचिव प्रा. प्राणेश मुरनाळ यांनी आभार मानले. पसायदान आणि त्यानानंतर राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

# 'सजगता आणि काळजी' हीच सायबर गुन्ह्यांपासून बचावाची गुरुकिल्ली !

## पत्रकारांच्या कार्यशाळेत सायबर तज्ञांचे मत

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** नागरिकांमध्ये सायबर गुन्ह्यांविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी सोलापूर शहर पोलिस दल सातत्याने प्रयत्नशील आहेत. ऑनलाइन फसवणूक, बनावट लिंक, ओटीपीची मागणी, सोशल मीडिया फसवणूक अशा सायबर गुन्ह्यांपासून सावध राहा. आपली वैयक्तिक व आर्थिक माहिती अनोळखी व्यक्तींना देऊ नका. तंत्रज्ञानाचा वापर करताना सजगता आणि सुरक्षितता बाळगणे हीच सायबर गुन्ह्यांपासून बचावाची गुरुकिल्ली असल्याचे सायबर तज्ञांनी सांगितले.



> फसवणूक झाल्यास '१९३० किंवा १९४५ वर संपर्क साधा
> कोणत्याही प्रकारची सायबर किंवा आर्थिक फसवणूक झाल्यास नागरिकांनी अजिबात वेळ न दवडता तत्काळ शासनाच्या १९३०, १९४५ या सायबर हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क साधावा किंवा थेट सायबर पोलिस ठाण्याशी संपर्क करावा, जेणेकरून खात्यातून गेलेली रक्कम तत्काळ गोठवून (फ्रीझ करून) वाचवता येऊ शकेल, असेही पोलिस उपायुक्त (गुन्हे) अश्विनी पाटील यांनी स्पष्ट केले.

यावेळी सोलापूर शहरातील ८० पत्रकार बांधव सहभागी झाले होते. सोलापूर शहर पोलिस आयुक्तालय व क्राइम पत्रकार संघाच्यावतीने शनिवारी पोलिस आयुक्तालयात पत्रकारांसाठी सायबर गुन्ह्यासंदर्भातील कार्यशाळा पार पडली. यावेळी पोलिस उपायुक्त (गुन्हे) अश्विनी पाटील, पोलिस उपायुक्त (परिमंडल) प्रितम यावलकर, सहाय्यक पोलिस आयुक्त (गुन्हे) दिलीप पवार, गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक अरविंद माने व क्राइम पत्रकार संघाचे अध्यक्ष विशाल भांगे यांच्यासह आदी पोलिस अधिकारी, कर्मचारी व पत्रकार बांधव उपस्थित होते.

या कार्यशाळेचे प्रास्ताविक व स्वागत सायबर पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक भालचंद्र ढवळे यानी केले. कार्यशाळेत सहभागी पत्रकारांना सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला.

'अनोळखी क्रमांकावरून येणारे मेसेज, संशयास्पद लिंक्स किंवा व्हॉट्सॲपवर येणाऱ्या अनधिकृत गोष्टींवर क्लिक करू नका.

एका क्लिकमुळे तुमच्या संपूर्ण मोबाईलचा ताबा सायबर गुन्हेगारांकडे जाऊ शकतो. बँक खात्यांची माहिती, छायाचित्रे आधारकार्डसारखी ओळखपत्रे सायबर गुन्हेगारांच्या हाती लागल्यास त्याचा गैरवापर करून बनावट खाती सुरू केली जातात आर्थिक फसवणूक केली जाते.' त्यांनी पुढे डिजिटल अरेस्ट, बनावट पोलिस अधिकारी बनून धमकावणे, शेअर मार्केटमधील गुंतवणुकीच्या नावाखाली होणारी कोट्यवधी रुपयांची फसवणूक, गॅस बिल भरण्याचे खोटे मेसेज आणि इन्स्टंट लोन ॲप्सच्या माध्यमातून होणारे ब्लॅकमेलिंग याविषयी घडलेल्या प्रत्यक्ष घटनांची उदाहरणे देऊन सायबर तज्ञ अविनाश पाटील व महिला पोलीस अंमलदार प्रांजली काळे यांनी माहिती दिली.

या कार्यक्रमास क्राइम पत्रकार संघाचे पदाधिकारी, सदस्य, सोलापूर विद्यापीठ मास कम्युनिकेशन विभागातील विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते. आभार इम्रान सगरी यांनी मानले.

# उजनीतील अकडेटा सेंटर प्रकल्पांबाबत काकोडकर समितीची पुनर्रचना करा: खा. धैर्यशील मोहिते-पाटील

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** उजनी धरण परिसरातील प्रस्तावित अक डेटा सेंटर, ग्रीन हायड्रोजन, फ्लोटिंग सोलर, बॅटरी स्टोरेज आणि अणुऊर्जा प्रकल्पांच्या संभाव्य परिणामांचा अभ्यास करण्यासाठी नियुक्त डॉ. अनिल काकोडकर समितीची पुनर्रचना करावी, अशी मागणी खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांनी महाराष्ट्र राज्याच्या उद्योग मंत्रालयाच्या प्रधान सचिवांकडे केली



समितीत जलसंपदा, पर्यावरण, कृषी, मत्स्यव्यवसाय आणि अणुसुरक्षा क्षेत्रांतील स्वतंत्र तज्ज्ञांसह शेतकरी, मच्छीमार व प्रकल्पप्रभावित नागरिकांचा समावेश करावा. नागरिकांच्या प्रश्नांना 'गैरसमज' न मानता वस्तुनिष्ठ पुराव्यांच्या आधारे त्यांचे निराकरण करावे, असेही पत्राद्वारे सुचवले आहे.

उजनी धरण हे सोलापूर जिल्ह्यातील पिण्याचे पाणी, सिंचन, शेती आणि मत्स्यव्यवसायासाठी महत्त्वाचे असल्याने प्रस्तावित प्रकल्पांचा जलसुरक्षा व पर्यावरणावर होणारा एकत्रित परिणाम शास्त्रीय पद्धतीने तपासावा, अशी मागणी त्यांनी केली.

काकोडकर समितीचा मसुदा अहवाल सार्वजनिक करून जनसुनावणी घ्यावी आणि नागरिकांच्या हरकती-सूचनांचा विचार करून अंतिम अहवाल प्रसिद्ध करावा.

तसेच, 'विकसित महाराष्ट्र २०४७'अंतर्गत प्रस्तावित डेटा सेंटर हबच्या धोरणाचा जलउपलब्धता व पर्यावरणीय क्षमतेच्या आधारे पुनर्विचार करावा, असेही त्यांनी सुचविले.

# जिल्ह्यातील 142 गावांना 140 टँकरद्वारे पाणीपुरवठा

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्ह्यात टंचाई निवारणार्थ दि. 18 ऑक्टोबर 2026 रोजी 142 गावे व 752 वाड्यांमधील 2 लाख 74 हजार 743 नागरिकांना व 96 हजार 916 पशुधनाला 140 टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात येत आहे. याशिवाय 40 विहिरी व 21 बोअर असे एकूण 61 जलस्रोत अधिग्रहित करण्यात आले आहेत, असे माहिती जिल्हा परिषदेच्या पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता प्रसाद काटकर यांनी दिली. तालुकानिहाय मंगळवेढा 37 गावे - 40 टँकर, सांगोला 26 गावे - 34 टँकर, अक्कलकोट 16 गावे - 9 टँकर, माढा 14 गावे - 16 टँकर, बार्शी 13 गावे - 3 टँकर, करमाळा 12 गावे - 9 टँकर, माळशिरस 10 गावे - 10 टँकर, उत्तर सोलापूर 6 गावे - 9 टँकर, दक्षिण सोलापूर 6 गावे - 8 टँकर, मोहोळ 2 गावे - 2 टँकर असून पंढरपूर तालुक्यात एकही टँकर सुरू नाही. जिल्ह्यात टंचाईग्रस्त भागात टँकरद्वारे नियमित पाणीपुरवठा सुरू असल्याची माहिती जिल्हा प्रशासनाकडून देण्यात आली आहे.